**नि.फौ.ख. क्र. १०८/२०२४**
सरकार विरुध्द शांताबाई व इतर
निशाणी क्रमांक – **२२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की –
माझे नांव – शिला मन्मथ गठोडे,
वय – ४५ वर्षे, धंदा – शेती,
रा.थोट सावरगांव, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन.ए.भांगे</u>**

मी आरोपींना ओळखते. आरोपी न्यायालयात हजर आहेत. घटना अडीच वर्षांपुर्वी संध्याकाळी १० वाजता झाली होती. घटनेच्या आदल्या दिवशी आरोपींनी मला मारहाण केली होती. त्याबाबत मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मी दिलेली तक्रार मागे घ्यावी म्हणून आरोपी क्र.३ बब्रुवान घरात शिरला. त्याने मला केसाला धरून घराबाहेर ओढले. आरोपी क्र.२ सुनिता ही माझी जाऊ आहे तिने माझ्या डोळ्यात मिरची टाकली. आरोपी शांता ही चुलत जाऊ आहे. तिने माझे गळयातील मंगळसुत्र तोडले व माझा मोबाईल ओढुन घेतला. अमीतने मला दगडाने व काठीने मारले होते. आरोपींनी माझी साडी ओढली. मला रस्त्यावर पाडले होते. आरोपी शांता व सुनिताने दगडाने मला मारले होते. आरोपींनी माझ्या केसाला औषध लावले. घटनेनंतर मी बेशुध्द झाले. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेले. पोलीसांनी मला घरी पाठविले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मी अहमदपूर येथील सरकारी दवाखाण्यात गेले. त्यानंतर पुढील उपचाराकामी लातूर येथे दाखल झाले. लातूरवरून हॉस्पीटलमधुन सोडल्यानंतर मी फिर्याद नोंदविली. घटनेच्या दोन दिवसांनंतर मी फिर्याद नोंदविली. आता मला फिर्याद दाखविली, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, फिर्यादीला **निशाणी क्रमांक २३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस. आर. केंद्रे**

०२. माझे सासु–सासरे हयात आहेत. सासु–सासऱ्यांचे वय ८० वर्षांपेक्षा जास्त आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझे पती व मुले भिमा कोरेगाव येथे राहतो. सासु व सासरे थोट सावरगाव येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने माझ्या सासऱ्यांच्या नावे असलेली जमीन मिळावी म्हणुन न्यायालयात दिवाणी दाखल केलेला आहे. दाव्यातील जमीन अर्धा एकर होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने दाखल केलेला दावा न्यायालयाने गुणदोषावर खारीज केला होता. त्यावर झालेले अपीलही खारीज झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासु–सासऱ्यांनी त्यांच्या पालनपोषणाकरीता पोटगी मिळावी म्हणुन उपजिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज दिला होता. तो अर्ज माझ्या पतीच्या विरूध्द मंजूर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, या निकालाविरूध्द जिल्हाधिकारी यांच्याकडे माझे पतीने अपील दाखल केले होते त्याचा निकालही सासऱ्यांच्या बाजूने लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोटगीची रक्कम माझे पती भरत नसल्यामुळे माझ्या सासु–सासऱ्याने अहमदपूर न्यायालयातही पोटगी मिळावी म्हणुन अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, या सर्व अर्जात सासु–सासऱ्यांनी माझ्या पतीसोबत आरोपी बब्रुवान यालाही पक्षकार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, फौजदारी चौकशी अर्ज क्र.२०९/२०२२ मध्ये निकाल झाला व त्यामध्ये सासु व सासऱ्यांना प्रत्येकी रूपये ३०००/– द्यावेत असा हुकूम झाला होता. माझे पतीने पोटगीची रक्कम जमा केली किंवा नाही याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या सासु–सासऱ्यांचे खाणे–पिणे व दवाखाण्याची सोय करतात.

०३. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासु–सासऱ्यांनी त्यांच्या हयातीत आम्हाला जमीन दिली नसल्याने मी विनाकारण आरोपींविरूध्द खोटया केसेस दाखल करीत असते.

**आरोपीच्या विधिज्ञांच्या विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक – १९.०६.२०२६.

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदपूर.